# रिटेल फायनान्स :-

## ४) इतर प्रक्रिया संस्था :-

कच्चा मालावर प्रक्रिया करुन उत्पादीत होणारा पक्का माल विक्री करणाऱ्या संस्था तसेच तयार मालावर वेगवेगळ्या प्रक्रिया करुन विक्री करणाऱ्या संस्था प्रक्रिया संस्थेमध्ये मोडतात. अशा संस्थेचा नोंदणी दाखला व पोटनियमातील वर्गीकरण या ठिकाणी प्रक्रिया संस्था अशी नोंद करणे असणे आवश्यक आहे. अशा संस्थाना खालील प्रमुख कारणासाठी कर्ज मंजूर करणेचे बँकेचे धोरण आहे.

### १) <u>इतर प्रक्रिया कॅश क्रेडीट कर्जे :-</u>

या कर्जासाठी संस्था स्वभांडवल / बाहेरुन भांडवल उभारणीची मर्यादा यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रक्कमेइतपत कॅश क्रेडीट कर्ज मंजूर करता येते. राज्य शासनाची हमी असेल तर स्वभांडवलाच्या दुप्पट रक्कमेइतपत कर्ज मंजूर करता येते.

### २) <u>इतर प्रक्रिया नजरगहाण कर्जे :-</u>

सदरची कर्जे प्रक्रिया संस्थांना विक्री लायक शिल्लक मालाचे तारणावर नजरगहाण कर्ज मंजुरी दिली जाते. अशा संस्थांनी केलेल्या कामापोटी येणे असलेली मंजुरीची बिले विचारात घेवून त्यांच्या ४०% दुराव्याने कर्ज मंजूर करता येते.

### ३) <u>इतर प्रक्रिया मध्यम मुदत कर्जे :-</u>

स्थावर व जंगम मालमत्ता निर्माण करण्यासाठी पुरेशा तारणावर दिली जातात. प्रक्रिया संस्थांना गोदाम बांधकाम/इमारत बांधकाम, प्रकल्प उभारणी कारणासाठी कर्ज मंजूर केले जाते.